प्रेषक:- वाहन विभाग, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका. भिवंडी

प्रति :- नगरसचिव,
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका.

विषय:- कार्यालयीन कामाकरिता भाडेतत्वावर वाहने उपलब्ध करुन घेणे करीता अर्थसंकल्पीय तरतुदीचे पुर्नविनियोन करणेकामी वाहन विभागातील वाहन भत्ता या लेखाशिर्षातुन निधी वर्ग करणे

प्रस्तावना,

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेस कार्यालयीन कामाकरिता भाडेतत्वावर वाहने पुरविणे या लेखाशिर्षाअंतर्गत पल्स पोलिओ मोहिमेकामी भाडेतत्वावर जीप वाहने पुरविणे, शासनाकडुन प्रतिनियुक्तीने आलेले अधिकारी वर्ग यांना कार्यालयीन कामाकरिता वाहने पुरविणे याकामी सन २०२२-२०२३ या वित्तीय वर्षात कार्यालयीन कामी भाडेतत्वावर वाहने पुरविणे या लेखाशिर्षात रक्कम रु.८०.०० लक्ष निधीची तरतुद करण्यात आलेली असुन सदर लेखाशिर्षा अंतर्गत रक्कम रु.७९.८१ लक्ष खर्च झालेला असुन रक्कम रु.०.१९ लक्ष तरतुद शिल्लक आहे. महानगरपालिका वाहन विभागातील कार्यालयीन कामा करीता भाडेतत्वावर वाहने घेणे व वाहनभत्ता या लेखाशिर्षाअंतर्गत खालील प्रमाणे खर्च झालेला आहे.

| अ.क्र. | लेखाशिर्ष | सन २०२१-२२ करीता करण्यात आलेली तरतुद | सन २०२१ - २२ मध्ये झालेला प्रत्यक्ष खर्च | दि.१५/११/२०२२ पर्यतची शिल्लक |
|---|---|---|---|---|
| १. | कार्यालयीन कामा करीता भाडेतत्वावर वाहने घेणे. | रु.८०.०० लक्ष | रु.७९.८१ लक्ष | रु.०.१९ लक्ष |
| २. | वाहन भत्ता | रु.६०.०० लक्ष | रु.१०.७७ लक्ष | रु.४९.२३ लक्ष |

तसेच सन २०२२-२०२३ या वर्षातील अदयाप तीन महिने कालावधी बाकी असुन या दरम्यान महानगरपालिकेस पल्स पोलिओ लसीकरण मोहिम, शासनाकडुन आलेल्या अधिकारी वर्गास व विभागास भाडेतत्वावर वाहन पुरविणे कामी मार्च २०२३ अखेर पर्यंत अंदाजे रक्कम रु.३५ लक्ष खर्च येणार आहे. तसेच वाहन विभागात उपलब्ध असलेल्या वाहनभत्ता या लेखाशिर्षाअंतर्गत सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षात रक्कम रु.६०.०० लक्ष असुन त्यापैकी रक्कम रु.१०.७७ लक्ष प्रत्यक्षात खर्च झालेला असुन रक्कम रु.४९.२३ निधी शिल्लक असुन मार्च २०२३ अखेर वाहनभत्ता लेखाशिर्षात अंदाजे रक्कम रु.१४.२३ खर्च येणार असुन रक्कम रु.३५.०० लक्ष निधी शिल्लक राहणार आहे.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेस कार्यालयीन कामाकरिता भाडेतत्वावर वाहने पुरविणे या लेखाशिर्षाअंतर्गत पल्स पोलिओ मोहिमेकामी भाडेतत्वावर जीप वाहने पुरविणे, शासनाकडुन प्रतिनियुक्तीने आलेले अधिकारी वर्ग यांना कार्यालयीन कामाकरिता वाहने पुरविणे याकामी सन २०२२-२०२३ या वित्तीय वर्षात कार्यालयीन कामी भाडेतत्वावर वाहने पुरविणे या लेखाशिर्षात तरतुद रक्कम रु०.१९ शिल्लक असल्याने वाहन विभागातील वाहनभत्ता या लेखाशिर्षातील रक्कम रु.३५.०० लक्ष निधी हा कार्यालयीन कामाकरिता वाहने पुरविणे या लेखाशिर्षात पुर्नविनियोजन करणे आवश्यक आहे.

तरी वाहन विभागातील भाडेतत्वावर वाहने पुरविणे या लेखाशिर्षाअंतर्गत तरतुद मार्च २०२३ पर्यंत अपुरी पडत असल्याने उपरोक्त कामाकरिता वाहन विभागातील वाहन भत्ता लेखाशिर्षामधुन रु.३५ लक्ष इतकी रक्कम भाडेतत्त्वावर वाहने पुरविणे या लेखार्शिषकात वर्ग करणे कामीच्या पुर्नविनियोजन प्रस्तावास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १०३ व लेखा संहिता १९७१ मधील नियम ३०(३) अन्वये प्रशासकीय मान्यता दि.१२/०१/२०२३ रोजी प्राप्त झालेली आहे. दिली आहे. त्यानुसार खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यात येत आहे.

**ठराव नं.** 83 **दिनांक :-** 23/01/2023

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एम.सी.ओ. २०२०/७१(भाग-२)/ नवि-१४, दिनांक.०६/०६/२०२२ अन्वये महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ अ (१ अ) तरतुदीनुसार महानगरपालिकेच्या या अधिनियमाखालील सर्व अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि तिची सर्व कामे व कर्तव्ये पार पाडण्यासाठी या पोट-कलमान्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, विजयकुमार म्हसाळ, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कनिष्ठ अभियंता (वाहन) व सहा. आयुक्त (वाहन) यांनी प्रस्तावित केल्यानुसार व उपआयुक्त (वाहन), मुख्य लेखा व वित्त अधिकारी व अतिरिक्त आयुक्त सो यांनी शिफारस केल्यानुसार वाहन विभागातील कार्यालयीन कामी भाडेतत्वावर वाहने पुरविणे या लेखाशिर्षात अंतर्गत सन २०२२-२०२३ या वित्तीय वर्षात मुळ अंदाजपत्रकीय तरतुद रक्कम रु.८०.०० लक्ष करण्यात आलेली होती त्यापैकी रक्कम रु.७९.८१ लक्ष खर्च झालेला असुन रक्कम रु.०.१९ लक्ष तरतुद शिल्लक आहे व मार्च २०२३ अखेर पर्यंत भाडेतत्वावर वाहने पुरविणे या लेखाशिर्षात अंदाजे रक्कम रु.३५ लक्ष खर्च येणार असल्याने वाहनभत्ता या लेखाशिर्षाअंतर्गत सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षात रक्कम रु.६०.०० लक्ष असुन त्यापैकी रक्कम रु.१०.७७ लक्ष प्रत्यक्षात रक्कम रु.४९.२३ खर्च झालेला आहे व मार्च २०२३ अखेर वाहनभत्ता लेखाशिर्षात अंदाजे रक्कम रु.१४.२३ खर्च येणार असुन रक्कम रु.३५.०० लक्ष निधी शिल्लक राहणार असल्याने सदरचा निधी भाडेतत्वावर वाहने पुरविणे या लेखाशिर्षात पुर्नविनियोजन प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १०३ व लेखा संहिता १९७१ मधील नियम ३०(३) अन्वये सोबत नमुना क्र.१० नियम ३०(३) नुसार अंदाजपत्रकीय पुर्नविनियोजन करणेस मान्यता देण्यात येत आहे.

(विजयकुमार म्हसाळ)
प्रशासक तथा आयुक्त,
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका.

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

**विषय:- मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण (MMR) क्षेत्रातील कल्याण डोंबिवली महानगरपालिका, परिवहन उपक्रमाची बस सेवा भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका या शहरांध्ये स्वतंत्र SPV च्या माध्यमातून परिवहन सेवा चालिवणे बाबत.**

**संदर्भ :- 1) जा.क्र./कडोंमपा/परि/मुका/839, दिनांक 13/12/2022 रोजीचे कल्याण डोंबिवली महानगरपालिका, परिवहन उपक्रम,कल्याण यांचे पत्र.**

<u>प्रस्तावना :-</u>

महाराष्ट्र शासनाने नगरविकास विषयक बाबींची चर्चा करण्यासाठी MMRDA क्षेत्रातील सर्व आयुक्त महोदयांची दिनांक 01/12/2020 रोजी मुंबई येथे कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेस नगरविकास विभागाचे मा. मंत्री महोदय आणि मा. राज्य मंत्री महोदय तसेच विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

सदर बैठकीत महानगरपालिकेच्या अखत्यारीतील कार्यरत बस सेवा सुविहीत/ सुनियोजित पध्दतीने कार्यान्वित करणेबाबत सविस्तर चर्चा झाली.

भिवंडी-निजामपुर शहर महानगरपालिका, उल्हासनगर महानगरपालिका, अंबरनाथ नगरपरिषद कुळगांव बदलापुर नगरपरिषद क्षेत्रात त्यांच्या स्वतंत्र सार्वजनिक परिवहन सेवा आस्थित्वात नसल्याने कल्याण डोंबिवली महानगरपालिका, परिवहन उपक्रमाची परिवहन सेवा सुरु करावी अशा शासनाच्या सूचना आहेत.

कल्याण डोंबिवली महानगरपालिका, परिवहन उपक्रमाकडून अनेक मार्गावर वाहतुक पुरविण्यात येत असून यात भिवंडी शहराचा देखील काही भाग आहे. एकसारखे मार्ग, मार्गाची पुनरावृत्ती, नियोजन खर्च, उपक्रमाची आर्थिक तुट, याचा सार्वजनिक परिवहन सेवेवर परिणाम, परिसरातील जनतेची, स्थानिक आमदार, पदाधिकारी, लोकप्रतिनिधी यांची सर्व विभागात बस सुरु करण्याची मागणी याचा साकल्याने एकत्रितपणे विचार करणेसाठी दिनांक 07/12/2022 रोजी भिवंडी-निजामपुर, उल्हासनगर महानगरपालिका आयुक्त तसेच अंबरनाथ व कुळगांव बदलापुर नगरपरिषद मुख्याधिकारी यांची कल्याण डोंबिवली महानगरपालिका आयुक्त महोदय यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीत शासन सूचनेनूसार सार्वजनिक परिवहन सेवांचा आर्थिक तोटा कमी करणे तसेच महानगरपालिका व नगरपरिषद हद्दीत सुयोग्य आणि नियोजन पध्दतीने पूणे जिल्हयातील PMPML धर्तीवर कल्याण-डोंबिवली, भिवंडी-निजामपुर शहर महानगरपालिका, उल्हासनगर महानगरपालिका, अंबरनाथ नगरपरिषद, कुळगांव-बदलापुर नगरपरिषद यांचे मुंबई महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 32 अन्वये या स्वायत्त संस्थांची Special Purpose Vehicle (SPV) परिवहन सेवा चालविण्यासाठी स्वतंत्र प्राधिकरण करण्याचे तसेच शासनाच्या मंजूरी अंती इंडियन कंपनी ॲक्ट 1956 अन्वये कंपनी (SPV) स्थापन करुन 'कल्याण-डोंबिवली, भिवंडी, उल्हासनगर, अंबरनाथ, कुळगांव-बदलापुर महानगर परिवहन निगम' अशी एकत्रीत (SPV) तयार करण्याचे सदर बैठकीत सर्वानुमते निश्चित करण्यात आले. त्यासाठी शासनाकडे एकत्रित प्रस्ताव पाठविणे आवशयक आहे.

**वरील प्रमाणे स्वतंत्र SPV तयार करतांना खालील नमुद चर्तु:सुत्री...**

1) **बस गाडयांचे नियोजन :** प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेसाठी लोकसंख्येवर आधारीत बसेसचे नियोजन.
2) **कर्मचारी वर्गाचे नियोजन :** मार्गावरील कर्मचारी वर्ग बाह्य यंत्रणेद्वारे आणि प्रशासकीय कर्मचारी वर्ग संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेकडून प्रतिनियुक्तीवर वर्ग होईल.
3) **मालमत्ता वापर आणि नियोजन :** संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या हद्दीतील मालमत्ता वाहतुकीच्या उपलब्ध करुन देण्यात येईल. सदर मालमत्तेचे विनियोग, नियोजन SPV च्या मार्फत करण्यात येईल. याबाबतचे अधिकार संबंधित SPV ला राहतील.
4) **संचलन तुटीचे नियोजन :** महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक: एनयुआर-2013/प्र.क्र.338 /नवि-33, दिनांक 18 फेब्रुवारी, 2014 अन्वये सार्वजनिक उपक्रमात प्रवासी वाहतुकीच्या संचलनात येणारी संचलन

तुटीमुळे होणारा खर्च हा संबंधित महानगरपालिकेने स्वत:च्या उत्पन्नातून भरुन काढणे बंधनकारक आहे. त्या अनुषंगाने एकत्रित SPV च्या संपूर्ण कार्यक्षेत्रात बस वाहतुक संचलनापोटी येणारी संचलन तुट (Oprational Losse) ही शासन निर्णयानूसार ज्या महापालिका/ नगरपरिषदेच्या हद्दीमध्ये ज्या संख्येने बसेस कार्यरत राहतील त्या बसेसच्या संख्येनूसार प्रत्यक्ष चालविलेल्या ऑपरेट कि.मी. प्रमाणे येणारी संचलन तुटी (Oprational Losses) ही SPV मध्ये सहभागी झालेल्या त्या-त्या महानगरपालिका/नगरपरिषदांनी भरुन देण्याचे दायित्व स्विकारणे. तसेच नफा झाल्यास प्राधिकरणामध्ये (SPV) सहभागी झालेल्या ULB यांच्या हद्दीत परिवहन सेवा विकास कामांसाठी अद्यावतीकरणासाठी वापरला जाईल.

वरील चतु:सुत्रीवर आधारीत SPV तयार करण्यासाठी प्रकरणी शासनाच्या मंजूरी करीता कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांचे मार्फत प्रस्तावित वरील प्रमाणे SPV मध्ये सहभाग घेणे आणि SPV मार्फत भिवंडी-निजामपुर शहरात सार्वजनिक वाहतुक सुरु करणे/नियोजन करणे, संचलन तुटीबाबत दायित्व स्विकारणे इत्यादी बाबींस या ठरावाद्वारे प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत असून एकत्रित परिवहन सेवेच्या मार्फत सदर ठरावानूसार आवश्यक अंमलबजावणी करणे करीता मा. आयुक्त यांना प्राधिकृत करण्याचे प्रस्तावित करण्यात येते.

त्यानुसार सर्व संबंधित (कल्याण डोंबिवली महानगरपालिका, उल्हासनगर महानगरपालिका, भिवंडी निजामपुर महानगरपालिका, अंबरनाथ नगरपरिषद, कुळगाव बदलापुर नगरपरिषद) यांचे बस / परिवहन प्राधिकरण तयार करण्यासाठी ठराव पारित करणेबाबत धोरणात्मक निर्णय घेणेकरीता सदरच्या प्रस्तावास मा. महासभेची मान्यता आवश्यक आहे. सद्या शासनाचे दिनांक 10 जुन 2022 च्या आदेशान्वये मा. आयुक्त यांना प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेले असल्याने मा. महासभेचे सर्व अधिकार मा. प्रशासक तथा आयुक्त यांना प्राप्त झालेले आहे. या अधिकार कक्षे नुसार उपरोक्त प्रस्तावास मा. प्रशासक तथा आयुक्त भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका यांच्या धोरणात्मक निर्णयासाठी सदरचा प्रस्ताव सविनय सादर.

**प्रशासकीय ठराव क्रमांक :-** ८४

**दिनांक :-** 23/09/2023

भिवंडी-निजामपुर शहर महानगरपालिका, उल्हासनगर महानगरपालिका, अंबरनाथ नगरपरिषद कुळगांव बदलापुर नगरपरिषद क्षेत्रात त्यांच्या स्वतंत्र सार्वजनिक परिवहन सेवा आस्थित्वात नसल्याने कल्याण डोंबिवली महानगरपालिका, परिवहन उपक्रमाची परिवहन सेवा सुरु करावी अशा शासनाच्या सूचना आहेत.

कल्याण डोंबिवली महानगरपालिका, परिवहन उपक्रमाकडून अनेक मार्गावर वाहतुक पुरविण्यात येत असून यात भिवंडी शहराचा देखील काही भाग आहे. एकसारखे मार्ग, मार्गाची पुनरावृत्ती, नियोजन खर्च, उपक्रमाची आर्थिक तुट, याचा सार्वजनिक परिवहन सेवेवर परिणाम, परिसरातील जनतेची, स्थानिक आमदार, पदाधिकारी, लोकप्रतिनिधी यांची सर्व विभागात बस सुरु करण्याची मागणी याचा साकल्याने एकत्रितपणे विचार करणेसाठी दिनांक 07/12/2022 रोजी भिवंडी-निजामपुर, उल्हासनगर महानगरपालिका आयुक्त तसेच अंबरनाथ व कुळगांव बदलापुर नगरपरिषद मुख्याधिकारी यांची कल्याण डोंबिवली महानगरपालिका आयुक्त महोदय यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीत शासन सूचनेनूसार सार्वजनिक परिवहन सेवांचा आर्थिक तोटा कमी करणे तसेच महानगरपालिका व नगरपरिषद हद्दीत सुयोग्य आणि नियोजन पध्दतीने पूणे जिल्हयातील PMPML धर्तीवर कल्याण-डोंबिवली, भिवंडी-निजामपुर शहर महानगरपालिका, उल्हासनगर महानगरपालिका, अंबरनाथ नगरपरिषद, कुळगांव-बदलापुर नगरपरिषद यांचे मुंबई महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 32 अन्वये या स्वायत्त संस्थांची Special Purpose Vehicle (SPV) परिवहन सेवा चालविण्यासाठी स्वतंत्र प्राधिकरण करण्याचे तसेच शासनाच्या मंजूरी अंती इंडियन कंपनी ॲक्ट 1956 अन्वये कंपनी (SPV) स्थापन करुन 'कल्याण-डोंबिवली, भिवंडी, उल्हासनगर, अंबरनाथ, कुळगांव-बदलापुर महानगर परिवहन निगम' अशी एकत्रीत (SPV) तयार करण्याचे सदर बैठकीत सर्वानुमते निश्चित करण्यात आले. त्यासाठी शासनाकडे एकत्रित प्रस्ताव पाठविणे आवश्यक असुन वरील प्रमाणे स्वतंत्र SPV तयार करतांना खालील नमुद चर्तु:सुत्री...

1) **बस गाडयांचे नियोजन :** प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेसाठी लोकसंख्येवर आधारीत बसेसचे नियोजन.

2) **कर्मचारी वर्गाचे नियोजन :** मार्गावरील कर्मचारी वर्ग बाह्य यंत्रणेद्वारे आणि प्रशासकीय कर्मचारी वर्ग संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेकडून प्रतिनियुक्तीवर वर्ग होईल.

3) **मालमत्ता वापर आणि नियोजन :** संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या हद्दीतील मालमत्ता वाहतुकीच्या उपलब्ध करुन देण्यात येईल. सदर मालमत्तेचे विनियोग, नियोजन SPV च्या मार्फत करण्यात येईल. याबाबतचे अधिकार संबंधित SPV ला राहतील.

4) **संचलन तुटीचे नियोजन :** महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक: एनयुआर-2013/प्र.क्र.338 /नवि-33, दिनांक 18 फेब्रुवारी, 2014 अन्वये सार्वजनिक उपक्रमात प्रवासी वाहतुकीच्या संचलनात येणारी संचलन तुटीमुळे होणारा खर्च हा संबंधित महानगरपालिकेने स्वत:च्या उत्पन्नातून भरुन काढणे बंधनकारक आहे. त्या अनुषंगाने एकत्रित SPV च्या संपूर्ण कार्यक्षेत्रात बस वाहतुक संचलनापोटी येणारी संचलन तुट (Oprational Losse) ही शासन निर्णयानूसार ज्या महापालिका/ नगरपरिषदेच्या हद्दीमध्ये ज्या संख्येने बसेस कार्यरत राहतील त्या बसेसच्या संख्येनूसार प्रत्यक्ष चालविलेल्या ऑपरेट कि.मी. प्रमाणे येणारी संचलन तुटी (Oprational Losses) ही SPV मध्ये सहभागी झालेल्या त्या-त्या महानगरपालिका/नगरपरिषदांनी भरुन देण्याचे दायित्व स्विकारणे. तसेच नफा झाल्यास प्राधिकरणामध्ये (SPV) सहभागी झालेल्या ULB यांच्या हद्दीत परिवहन सेवा विकास कामांसाठी अद्यावतीकरणासाठी वापरला जाईल.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 452 (अ) (1) नुसार दिनांक 10 जुन 2022 अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी श्री. विजयकुमार म्हसाळ, प्रशासक, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे व इतर सर्व अनुषंगिक बाबींचा सदर प्राधिकरणात समावेश करुन घेणे बंधनकारक असेल या अटीवर व इतर आवश्यक अटींच्या आधिन राहून मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण (MMR) क्षेत्रातील कल्याण डोंबिवली महानगरपालिका परिवहन उपक्रमाची बस सेवा भिवंडी निजामपूर शहर, उल्हासनगर, अंबरनाथ व कुळगांव बदलापूर या शहरांमध्ये स्वतंत्र SPV तयार करतांना वरील चतु:सूत्रीवर आधारीत SPV तयार करण्यासाठी प्रकरणी शासनाच्या मंजूरी करीता कल्याण- डोंबिवली महानगरपालिका यांचेमार्फत प्रस्तावित वरीलप्रमाणे SPV मध्ये सहभाग घेणे आणि SPV मार्फत भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका शहरात सार्वजनिक वाहतुक सुरु करणे/ नियोजन करणे, संचलन तुटी बाबत दायित्व स्विकारणे व इत्यादी बाबींस परिवहन सेवा चालविणेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

**वरील प्रमाणे ठराव मंजुर**

**(श्री. अनिल प्रधान)**
**नगरसचिव**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**

**(श्री. विजयकुमार म्हसाळ)**
**प्रशासक**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**